SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000
www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52


संदर्भ.जा.क्र./शिवाजी वि./रा.से.यो./ई–मेलद्वारे /1378 दिनांक २५/११/२०२५

| | |
|---|---|
| **प्रति,**<br>**मा. प्राचार्य /प्राचार्या,**<br>**शिवाजी विद्यापीठ अंतर्गत**<br>**सर्व राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित महाविद्यालये, कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हा** | **प्रति,**<br>**मा. अधिविभागप्रमुख,**<br>**सर्व राष्ट्रीय सेवा योजना संलग्न अधिविभाग,**<br>**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** |

विषय : भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा च्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीबाबत....

संदर्भ : महाराष्ट्र शासन, शिक्षण संचलनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील क्र.:उशिसं/भारतीय संविधान प्रश्न मंजुषा/मवि–१/२०२५/ई.२४०८३२२/२०३४ दिनांक २४/११/२०२५ रोजीचे पत्र....

महोदय / महोदया,

वरील विषय व संदर्भान्वये प्राप्त पत्रानुसार महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचेकडील दिनांक १६/०९/२०२५ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार व युवा करीअर, नागपूर यांनी सादर केलेल्या भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा –२०२५ संदर्भात निर्देशकातील सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास व शासनास सादर करण्याबाबत कळविले आहे

सदर युवा करीअर तर्फे आयोजित भारतीय संविधान क्विझद्वारे न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता यांसारख्या मूल्यांची जाणीव करून देणेसह संविधानात नमूद केलेल्या अधिकार, कर्तव्यांचा सखोल अभ्यास, धोरण मार्गदर्शक तत्वे : शासनात यांची भूमिका व महत्व, शासन रचना : कार्यकारी, विधायिका आणि न्यायपालिका यांची भूमिका व कार्ये. मुख्य दुरूस्ती व ऐतिहासिक खटले : सर्वोच्च न्यायालयाचे महत्वाचे निर्णय आणि संविधानातील प्रमुख दुरूस्ती, संविधान निर्माता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि इतर प्रमुख व्यक्तींचे योगदान याविषयी जागरूकता निर्माण करून विद्यार्थ्यांना राज्य पातळीवर असे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

याबाबत सदर युवा करीअर तर्फे आयोजित भारतीय संविधान क्विझमधील सहभागास अनुसरून https://yuvacareer.com/indian-constitution-awareness-quiz/ या लिंकद्वारे प्रती विद्यार्थी रू.९९/– इतके नोंदणी शुल्क लागू असेल जे नोंदणी शुल्क संबंधित महाविद्यालयाने भरून प्रत्येक महाविद्यालयातून किमान १० सहभागी विद्यार्थी स्पर्धकांची ऑनलाईन नावनोंदणी करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सदर भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा स्पर्धेमधील सहभागाकरीता प्रोत्साहित करणेत यावे **ही विनंती.**

अधिक माहितीकरीता यासोबतच्या पत्राचे अवलोकन करणेत यावे तसेच कोल्हापूर जिल्हयाकरीता डॉ. भगवान पाटील, सायबर कॉलेज, कोल्हापूर संपर्क : ७७९८८८५०१५ तसेच सांगली जिल्हयाकरीता डॉ. गोरखनाथ किर्दत, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, उरूण इस्लामपूर जि. सांगली संपर्क : ७०२०४५९९६३ व सातारा जिल्हयाकरीता डॉ. कोंडीबा शिंदे, डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव जि. सातारा संपर्क : ७५५८४५५६१८ याप्रमाणे जिल्हानिहाय संविधान जागृती प्रश्न मंजुषा कार्यक्रम जिल्हा समन्वयक यांचेशी संपर्क साधाणेत यावा.

कळावे,

I/c 25/11

आपला विश्वासू,



**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना कक्ष,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,
४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्र.: उशिसं/भारतीय संविधान प्रश्न मंजुषा /मवि-१/२०२५/ई. २४०८३२२ / 2035 दि. २४/११/२०२५

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

२. कुलसचिव,
सर्व अकृषी/अभिमत/स्वयंअर्थसहायीत/खाजगी विद्यापीठे

३. प्राचार्य, शासकीय/अशासकीय/अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालये/मॉडेल डिग्री महाविद्यालये.

४. संचालक, सर्व भारतीय प्रशासकीय सेवापुर्व प्रशिक्षण केंद्र.

विषय:- "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा च्या अनुषंगाने दि.१६.९.२०२५ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत.

संदर्भ:- १. शासनपत्र क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.९४/समन्वय/दि.१७.११.२०२५

२. महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. मराअजाआ/सा.आ/प्र.क्र.५४१-२०२५/दि.२२.९.२०२५च्या पत्रासोबत युवा करिअर, नागपूर यांचे पत्र.

उपरोक्त संदर्भांकित पत्राचे अवलोकन व्हावे.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र.१ शासनपत्रान्वये महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचेकडे दि.१६.९.२०२५ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्त व युवा करिअर, नागपूर यांनी सादर केलेल्या भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ संदर्भात निर्देशकातील सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास व शासनास सादर करण्याबाबत कळविले आहे.

त्यानुषंगाने भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा -२०२५ या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संदर्भांकित पत्रातील सुचना व निर्देशानुसार आपल्या स्तरावरुन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयाच्या mavi.dhepune@nic.in या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@gov.in

क्रमांक:- बैठक -२०२५/प्र.क्र. ९४/समन्वय दिनांक:- १७ नोव्हेंबर, २०२५.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, ( कला ), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय - "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" च्या अनुषंगाने दिनांक १६/९/२०२५ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत**

महोदय,

महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग, मुंबई यांचे क्रमांक मराअजाआ/सा.आ./प्र.क्र. ५४१-२०२५/३९२२, दिनांक २२/९/२०२५ चे पत्र व त्यासोबतचे युवा करियर, नागपूर यांचे पत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

२. महाराष्ट्रातील शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची भारतीय संविधानाच्या इतिहास व संरचनेची समज वाढविणे या उद्दीष्टांच्या अनुषंगाने "भारतीय संविधानाची जागृती करणे, संविधानाविषयी नागरीकांचे गैरसमज दुर करणे या करीता प्रशिक्षण देणे" याकरीता, युवा करियर, नागपूर यांनी युवकांमध्ये संविधानाविषयी जागृती निर्माण होण्याच्या दृष्टीने " भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५" कार्यक्रमाचे आयोजन करण्याची महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती व जमाती आयोग, मुंबई यांना विनंती केली असून, त्यानुसार राबवावयाच्या कार्यक्रमाचे उद्दीष्ट, कार्यक्षेत्र, रचना, बक्षिसे व मान्यता, नोंदणीप्रक्रीया याबाबतची रुपरेषा तयार करण्यात आली आहे.

३. "भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा" च्या आयोजनासंदर्भात उपाध्यक्ष (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचेकडे दिनांक १६/९/२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तात खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.

१) संविधान अमृतमहोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजुषा- २०२५ या राज्यव्यापी उपक्रमात जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी व्हावेत

यासाठी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व सचिव, शालेय शिक्षण विभाग , मंत्रालय यांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२) यानुसार राज्यातील सर्व शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण संस्था तसेच विद्यापीठांना या उपक्रमाची सविस्तर माहिती त्वरीत कळविणारे परिपत्रक जारी करावे., जेणे करुन संबंधित संस्था विद्यार्थ्यांना वेळेत मार्गदर्शन करुन त्यांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करु शकतील.

३) या परिपत्रकात प्रत्येक शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांनी त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर (Website) संविधान प्रश्नमंजुषा,२०२५ या आयोजनाची माहिती ठळकपणे प्रसिद्ध करण्याबाबत स्पष्ट सुचना द्याव्यात. जेणेकरुन विद्यार्थ्यांना स्पर्धेचे नियम, नोंदणी प्रक्रीया व महत्त्वाचे दिनांक याबाबत सहज माहिती मिळेल.

४) प्रत्येक जिल्हयात या उपक्रमाच्या समन्वयासाठी एक जिल्हा समन्वयक नेमण्यात यावा. तसेच नेमलेल्या समन्वयकांचे नावं, पदनाम व संपर्क क्रमांक यांची माहिती संकलित करुन ती त्वरीत राज्य अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती आयोगास सादर करावी.

५) परिपत्रकात, विद्यार्थ्यांना संविधान प्रश्नमंजुषा-२०२५ ची उद्दीष्टे, स्पर्धेतील सहभागाची पद्धत, नोंदणी प्रक्रीया, अंतिम दिनांक तसेच जिल्हास्तरीय संपर्क अधिकारी यांची माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात यावी.

६) विभागांनी आपल्या सर्व संलग्न प्राधिकरणे, संस्था व प्रकल्प कार्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत जास्तीत जास्त सहभाग मिळवून देण्यासाठी आवाहन करावे.

७) या संपूर्ण जनजागृती उपक्रमाची प्रगती, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद , तसेच राबवविण्यात आलेलया उपाययोजना याबाबतची सविस्तर माहिती राज्य अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती आयोगास लेखी स्वरुपात सादर करावी.

८) विद्यार्थ्यांसाठी संविधानावर आधारीत अभ्यासक्रम तयार करावा व जिल्हा स्तरावरील तसेच राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी प्रश्नपत्रिका परस्पर समन्वय साधून तयार करावी. संविधानाशी संबंधित विषय तांत्रिक व कायदेशीर स्वरुपाचे असल्याने विद्यार्थी सहजतेने समजू शकतील अशा पद्धतीने मराठी, हिंदी व इंगजी या तिन्ही भाषांमध्ये प्रश्नपत्रिका व मार्गदर्शक साहित्य वेळेत तयार करुन, तयार केलेला अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका व त्यासंबधीची संपूर्ण कार्ययोजना याबाबतचा सविस्तर अहवाल आणि प्रगती व माहिती व त्यांचे अनुपालन याची माहिती सर्व विभागांनी संयुक्तरित्या राज्य अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती आयोगास तात्काळ सादर करावी.

६. तरी, उपाध्यक्ष (सचिव दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, मुंबई यांचेकडे दिनांक १६/९/२०२५ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्त व युवा करीयर, नागपूर यांनी सादर केलेल्या भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५ संदर्भात निर्देशिकातील सूचनांच्या अनुषंगाने

आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास तसेच शासनास सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपली,

सोबत : वरीलप्रमाणे.

गौरी म्हस्के

( गौरी म्हस्के )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

उपसचिव ( म.शि./ तांशि/ विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

भारतीय जनता

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय): २४९४१८१९/०२ E-mail:adit-scstcomm@yahoo.com


जा.क्र.मराअजाआ/सा.आ./प्र.क्र.५४१-२०२५/4688 दिनांक: 10/११/२०२५

अ.मु.स. उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. 2352 दि. 11/11/25

प्रति,

१.मा.सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२.मा.सचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
३.मा.सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
४.मा.सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
५.मा.सचिव,इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
६.मा.सचिव,अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
७.मा.सचिव,माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
८.मा.आयुक्त,आदिवासी विकास विभाग,राम गणेश गडकरी चौक,जुना आग्रा रोड,नाशिक-२२
९.मा.आयुक्त,समाज कल्याण आयुक्तालय,म.रा.पुणे
१०.कुलगुरू,महाराष्ट्र विधी विद्यापीठ,नागपूर
११.मा.महासंचालक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,म.रा.पुणे
१२.मा.संचालक,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,म.रा.पुणे

विषय : " भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा २०२५ " युवा करिअरद्वारे निर्देशिका

संदर्भ :- १.आयोगाचे पत्र क्र.मराअजाजआ/सा.आ./प्र.क्र.५४१-२०२५/३९२२ दि.२२/०९/२०२५
२.आयोगाचे पत्र क्र.मराअजाजआ/सा.आ./प्र.क्र.५४१-२०२५/४१९७ दि.८/१०/२०२५

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने अर्जदार श्री.मोनाल अ. थुल युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्था यांच्या "संविधान जागृती प्रश्न मंजुषा-२०२५"च्या विषयाबाबत दि.१६/०९/२०२५ रोजी आयोगाचे मा. ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष (सचिव दर्जा),महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती आयोग, मुंबई यांचे समोर झालेल्या सुनावणीचे इतिवृत्त आपणाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते. परंतु त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राप्त न झाल्याने दि.१२/११/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोगाच्या कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीस इतिवृत्ताच्या अनुषंगाने अहवालासह व संपुर्ण माहितीसह उपस्थित रहावे. इतिवृताची प्रत सोबत जोडली आहे.

मा.ॲड.धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष (सचिव दर्जा),महाराष्ट्र राज्य, अनुसूचित जाती आयोग, मुंबई यांच्या आदेशानुसार कळविण्यांत येत आहे.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग मुंबई

(रमेश वळवी)
पोलीस निरीक्षक
महाराष्ट्र राज्य अनु.जाती आयोग,
वरळी,मुंबई

उ.स. (विधि)

प्रत :- अर्जदार श्री.मोनाल अ. थुल युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्था, नागपूर

आवक प्राप्त
गोरी
१३.११.२५

अ.स.(समन्वय)
कृष्णा पहाडे. [illegible]
13.11.25

श्रीम. गोरा
गोरी
१३.११.२०२५

[illegible]

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग
प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुलगफारखान मार्ग,वरळी सी-फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय) ०२२-२४९४३८१९.

आयोगाचे मा.ॲड. धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली दि. १६/०९/२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे.

(सामाजिक व आर्थिक विभाग) प्रकरण क्रमांक- ५४१/२०२५

विषय :भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा- २०२५ : युवा करिअरद्वारे निर्देशिका.

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. सुरज मुनेश्वर, कक्ष अधिकारी उपस्थित. सचिव, तंत्र व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वतीने श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव उपस्थित. सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. निलेश तायडे उपस्थित. श्रीमती चंचल पाटील, सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने श्री. सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक युवा करियर बोधीवृक्ष शिक्षण संस्थेचे श्री.मोनाल अ. थुल उपस्थित होते.

श्रीमती चंचल पाटील, सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नमूद केले की, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार वर्ग -८ वी ते पदवीधर पर्यंतच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनुसार कार्यक्रमाबाबत जागरुकता निर्माण करावी लागेल. तसेच सर्व संबंधित विभागाच्या मार्फत शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळा, वसतीगृह व प्रशिक्षण संस्था व इतर संस्था यांचेपर्यंत तात्काळ प्रभावाने आयोजनाची माहितीबाबत विद्यार्थ्यांमध्ये पोहचणेबाबतची परिपत्रके काढणे आवश्यक आहे.

महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वतीने श्री.सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक यांनी नमूद केले की, संविधान अमृत महोत्सवी जनजागृतीबाबत उपक्रमाकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तशी तरतूद उपलब्ध आहे. त्या निधीतून सदर उपक्रम राबविता येईल. तसेच सध्या २ महिने बाकी आहेत. सदरचा उपक्रम हा तात्काळ प्रभावाने महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच जर १५ दिवसांचा प्रशिक्षण अभ्यासक्रम, संकेतस्थळ व इतर संबंधित तयारी तात्काळ करणे आवश्यक आहे. जर प्रशिक्षणाबाबत अभ्यासक्रम ३ भाषेमध्ये उपलब्ध असेल तर तो ऑनलाईन संकेतस्थळाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. तसेच या अभ्यासक्रमामध्ये नागरिकांसंबंधित भाग-३ रा मुलभूत हक्क, भाग-४ राज्य निर्देशत्वाची माहिती, मुलभूत कर्तव्य याबाबतची माहिती, संविधानाबाबत व त्यातील कायद्यांची माहिती देणे गरजेचे आहे. याबाबत सविस्तर सहाय्यता करण्यास विभाग तत्पर राहिल.

सचिव, शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे वतीने श्री. अनिरुध्द कुलकर्णी, अवर सचिव यांनी नमूद केले की, सदर उपक्रमाबाबत संबंधित कार्यालयाकडून संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ पासून "घर घर संविधान" कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना सादर करण्यात आला होता. त्यानुसार दि. १२.१२.२०२४ नुसार शालेय शिक्षण व साक्षर विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार संविधान दिन साजरा करण्यासाठी सूचक उपक्रम देण्यात आले असून त्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या पत्रानुसार घर घर संविधान कार्यक्रम साजरा करणेबाबतचा निधी वितरीत केला आहे.

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे वतीने श्री. सुरज मुनेश्वर, कक्ष अधिकारी यांनी नमूद केले सदर उपक्रमाबाबत आयोगामार्फत प्रस्ताव विभागास सादर केल्यास व आयोगाने त्याबाबतच्या दिलेल्या निर्देशानुसार प्रस्ताव सचिव यांचेकडे निधीबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल. सदर उपक्रमाचा लाभ विद्यार्थ्यांना घेण्याकरिता निधीची तरतूद करता येईल.

तसेच, या उपक्रमाची जिल्हास्तरीय अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सहाय्यक आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. हे नोडल अधिकारी जिल्ह्याच्या पातळीवर शैक्षणिक संस्थांमध्ये स्पर्धेची माहिती पोहोचविणे, विद्यार्थ्यांचा सहभाग निश्चित करणे, आयोजनाची देखरेख करणे आणि आर्थिक खर्चाचा हिशोब सादर करणे यास जबाबदार राहतील.

वरील सर्व बाबींची काटेकोर अंमलबजावणी करून संविधान प्रश्नमंजुषा २०२५ हा उपक्रम राज्यभर यशस्वीरीत्या राबविण्यात यावा, असे निर्देशित करण्यात येत आहे.

संविधान अमृतमहोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजुषा २०२५ या राज्यव्यापी उपक्रमात जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील यासाठी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तात्काळ कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. यानुसार राज्यातील सर्व शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण संस्था तसेच विद्यापीठांना या उपक्रमाची सविस्तर माहिती त्वरित कळविणारे परिपत्रक जारी करावे, जेणेकरून संबंधित संस्था विद्यार्थ्यांना वेळेत मार्गदर्शन करून त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करू शकतील. सदर परिपत्रकात प्रत्येक शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांनी त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर (website) संविधान प्रश्नमंजुषा २०२५ या आयोजनाची माहिती ठळकपणे प्रसिद्ध करण्याबाबत स्पष्ट सूचना द्याव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांना स्पर्धेचे नियम, नोंदणी प्रक्रिया व महत्त्वाचे दिनांक याबाबत सहज माहिती मिळेल. तसेच प्रत्येक जिल्ह्यात या उपक्रमाच्या समन्वयासाठी एक जिल्हा समन्वयक (District Coordinator) नेमण्यात यावा. नेमलेल्या समन्वयकांचे नाव, पदनाम व संपर्क क्रमांक यांची माहिती संकलित करून ती त्वरित राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास सादर करण्यात यावी.

संविधान अमृत महोत्सवी जनजागृती अभियान अंतर्गत आयोजित संविधान प्रश्नमंजुषा २०२५ हा उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत भारतीय संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग तसेच अल्पसंख्याक विकास विभाग यांनी त्यांच्या विविध योजनांद्वारे लाभ घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत या कार्यक्रमाची सविस्तर माहिती पोहोचविण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी. संबंधित विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी परिपत्रक जारी करून कार्यक्रमाची माहिती सर्व शैक्षणिक संस्था, निवासी शाळा, वसतिगृह, प्रशिक्षण केंद्रे इत्यादींना लेखी स्वरूपात कळविण्यात यावी.

सदर परिपत्रकात विद्यार्थ्यांना संविधान प्रश्नमंजुषा २०२५ ची उद्दिष्टे, स्पर्धेतील सहभागाची पद्धत, नोंदणी प्रक्रिया, अंतिम दिनांक तसेच जिल्हास्तरीय संपर्क अधिकारी यांची माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात यावी. विभागांनी आपल्या सर्व संलग्न प्राधिकरणे, संस्था व प्रकल्प कार्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत जास्तीत जास्त सहभाग मिळवून देण्यासाठी आवाहन करावे. या संपूर्ण जनजागृती उपक्रमाची प्रगती, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद, तसेच राबविण्यात आलेल्या उपाययोजना याबाबतची सविस्तर माहिती राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास लेखी स्वरूपात सादर करावी.

RUPE

ाठी संविधानावर आधारित अभ्यासक्रम तयार करावा व जिल्हास्तरावरील तसेच राज्यस्तरावरील स्पर समन्वय साधून तयार करावी. संविधानाशी संबंधित विषय तांत्रिक व कायदेशीर स्वरूपाचे तेने समजू शकतील अशा पद्धतीने मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांमध्ये प्रश्नपत्रिका व तयार केलेला अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका व त्यासंबंधीची संपूर्ण कार्ययोजना याबाबतचा सविस्तर अहवाल याचे अनुपालन संबंधित सर्व विभागांनी संयुक्तरित्या राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती ने सादर करण्यात यावी.

(ॲड. धर्मपाल मेश्राम)
उपाध्यक्ष तथा सदस्य

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग
मुंबई

युवा कारियर

प्रति,

मा. उपाध्यक्ष तथा सदस्य,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग,
म. रा., मुंबई

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग, वरळी, मुंबई ४०० ०१८
आवक क्र 4856 दिनांक : 26.8.25
कार्यालय अधीक्षक

विषय :- भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 : युवा करिअर द्वारे निर्देशिका.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस विनंती अर्ज सादर करतो की, बोधी वृक्ष शिक्षण संस्था, नागपूर व्दारा संचालित युवा करियर क्लबव्दारा युवकोचा भविष्याच्या दृष्टीकोनातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असतात. आम्ही समाजातील युवकांमध्ये संविधाना विषयी जनजागृती करण्यासाठी भारतीय संविधान जागृती मंजुषा-२०२५ हा कार्यक्रम राबविणार आहोत. ज्याव्दारे युवकांमध्ये संविधाना विषयी जागृती निर्माण होईल. आम्ही राबविणाऱ्या कार्यक्रमाची रुपरेषा खालीलप्रमाणे असणार आहे.

1. परिचय :

भारतीय संविधान, जे 26 जानेवारी 1950 रोजी स्वीकारले गेले, हे जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे अधिष्ठान आहे, ज्यामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे मूल्य अंतर्भूत आहेत. युवा करिअरने भारतीय संविधान क्विझ स्पर्धा 2025 ची सुरुवात केली आहे, ज्यामुळे युवकांमध्ये संविधानाचे महत्त्व समजावे आणि नागरिक ज्ञानास प्रोत्साहन मिळावे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानाच्या तत्त्वांविषयी सखोल आदर निर्माण करणे, त्यांना स्वस्थ स्पर्धेत सहभागी करून घेणे आणि त्यांच्या अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्यांविषयी जागरूकता वाढवणे हा आहे.

2. उद्दिष्टे :

युवा करिअर तर्फे आयोजित भारतीय संविधान क्विझचे उद्दिष्ट :
विद्यार्थ्यांची भारतीय संविधानाच्या इतिहास व संरचनेची समज वाढवणे. नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये तसेच भारतीय लोकशाहीची कार्यपद्धती याविषयी जागरूकता निर्माण करणे. विद्यार्थ्यांना भारताच्या घटनात्मक इतिहासाची व प्रमुख नेत्यांच्या योगदानाची कदर करण्यास प्रेरित करणे. विद्यार्थ्यांना राज्य पातळीवर असे व्यासपीठ उपलब्ध करून देणे जिथे ते आपले नागरिक ज्ञान व शासनाची समज प्रदर्शित करू शकतील.

3. प्रमुख फोकस क्षेत्रे :

प्रस्तावना : न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता यांसारख्या मूल्यांची जाण. मूलभूत अधिकार व कर्तव्ये : संविधानात नमूद केलेल्या अधिकार व कर्तव्यांचा सखोल अभ्यास. धोरण मार्गदर्शक तत्त्वे : शासनात यांची भूमिका व महत्त्व. शासन रचना : कार्यकारी, विधायिका आणि न्यायपालिका यांची भूमिका व कार्ये. मुख्य दुरुस्ती व ऐतिहासिक खटले : सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्णय आणि संविधानातील प्रमुख दुरुस्ती. संविधान निर्माता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि इतर प्रमुख व्यक्तींचे योगदान.

**4. भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 रचना :**

**नोंदणी** : महाराष्ट्रातील शाळा व महाविद्यालये आपले विद्यार्थी युवा करिअरच्या ऑनलाइन व्यासपीठाद्वारे नोंदवू शकतात. प्रारंभिक फेरी : संविधान, शासन व नागरिक कर्तव्यांविषयी विद्यार्थ्यांचे ज्ञान तपासणारी ऑनलाइन परीक्षा. जिल्हा व राज्य स्तर : प्रारंभिक फेरीतील निवड विद्यार्थी पुढील स्तरावर सहभागी होतील. राज्यस्तर : राज्यस्तरीय विजेते राज्य स्तरावर स्पर्धा करतील.

Phone.
9422038808
Email.
yuvacareerclub2015@gmail.com
Address.
Shatabdi Sq. Manewada Ring Rode,
Nagpur.

DATE:

5. भाषा व सुलभता :
स्पर्धेत व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी, भारतीय संविधान जागृती प्रश्न मंजुषा - 2025 मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये आयोजित केली जाईल. यामुळे विविध भाषिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना समान संधी मिळेल.

6. बक्षिसे व मान्यता :
सर्वोत्तम शाळा : राज्य स्तरावर तीन शाळांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख पारितोषिके. व्यक्तिगत पुरस्कार : उत्कृष्ट विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, प्रमाणपत्रे व विशेष मान्यता. सहभाग प्रमाणपत्र : सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात येतील.

7. आयोजन संस्था :
युवा करिअर, जी संस्था युवक विकास व करिअर मार्गदर्शन यावर लक्ष केंद्रित करते, ती संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यास व विद्यार्थ्यांमध्ये नागरिक जबाबदारी प्रोत्साहित करण्यास कटिबद्ध आहे.

नोंदणी प्रक्रिया :
1. आंतरिक निवड : शाळा व महाविद्यालये स्वतःची पहिली निवड फेरी आयोजित करतील. निवडलेले विद्यार्थी प्रारंभिक फेरीसाठी नोंदणी करतील.
2. पात्रता : प्रारंभिक फेरीसाठी नोंदणी सर्व शाळा व महाविद्यालयांना खुली आहे.
3. नोंदणी अट : शाळा व महाविद्यालयांना किमान 10 विद्यार्थ्यांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी करता येईल.
4. नोंदणी शुल्क : प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ₹99 शुल्क लागू होईल. नोंदणीवेळी शाळा / महाविद्यालय हे शुल्क भरतील.
5. नोंदणी लिंक : शाळा व महाविद्यालये [युवा करिअर क्लब] www.yuvacareer.com या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करू शकतात. नोंदणी व शुल्क भरण्याची प्रक्रिया "भारतीय संविधान क्विझ स्पर्धा"पृष्ठावर उपलब्ध असेल.

तरी वरील कार्यक्रम राबविण्यास आपणांस विनंती करतो, की संबंधीतास त्याबाबत आदेश निर्गमीत करण्यात यावे, ही विनंती.

धन्यवाद !


आपला विश्वासु,

(मोनाल थुल),


युवा करियर
आपके करियर के साथी

English SEARCH MENU

Career Guidance Govt Jobs Private Jobs Competitive Exam Preparation Free Books Question Papers




Constitutional history books




## Constitution Awareness Quiz 2025

All students studying in the state of Maharashtra are hereby informed that the Constitution Awareness Quiz 2025 will be conducted online. The programme includes training sessions, a mock test, and district- and state-level examinations. Educational awareness programs

**1. Online Training (15 Days)**

All registered students will receive 15 days of online training conducted by expert faculty members from Maharashtra National Law University, Nagpur.

The training will cover important constitutional topics, study material, practice questions, and doubt-clearing sessions.

Go2Skillz: Smart PDF Converter

It supports a wide range of formats such as Word, images.

go2skillz

In addition, guest lectures by distinguished experts will also be arranged.

**2. Mock Test**
A mock test will be conducted after the completion of the training to help students understand the exam format and evaluate their preparation.

**3. District-Level Examination**
After the mock test, students will appear for the district-level online examination.
Top performers from each district will qualify for the state-level round.

**4. State-Level Examination**
Selected students from all districts will appear for the state-level examination.
The first, second, and third rank holders at the state level will receive cash prizes, trophies, and certificates.

**5. Awards and Certificates**
•State-Level Winners: Cash prize + Trophy + Certificate
•District-Level First Rank: Trophy + Certificate
•All Participants: Government-issued Certificate

**6. Registration Process**
The registration process will begin soon. Students must fill in the primary registration form with accurate and complete details.
After screening and verification, the training schedule, exam dates, rules, guidelines, and other important instructions will be shared through email or phone. (₹99 Registration fees applicable).

---

**Note:**
The registration form is only for primary registration.
After screening the forms, only eligible students will receive further instructions via email or Call.

Go2Skillz: Smart PDF Converter

It supports a wide range of formats such as Word, images.

go2skillz

Primary registration does not confirm for final eligibility.

## Register This Form

Full Name *

Date of Birth *

DD/MM/YYYY

Age *

School / College Name *

Class / Year *

Institution District *

Student ID / Roll No. *

Medium of Institution *

Marathi

Comfortable Language for Quiz *

- Marathi
- Hindi
- English

Mobile No. *

Email Address

Optional But Recommended

Parent / Guardian Name (Required if student is under 18)

Required if student is under 18

Parent / Guardian Contact *

Required if student is under 18

Upload Photo (File Type - JPG, PNG, JPEG) *

Choose file No file chosen

Upload Student ID / Bonafide Certificate (File Type - PDF, JPG, JPEG, PNG)) *

Choose file No file chosen

Declaration & Consent *

युवा करियर

आपके करियर के साथी

Get latest career news, government and private job updates, free books, question papers and complete information about competitive exam preparation on Yuva Career.

**Popular Category**

Career News

Career Guidance
Question Paper
Private Jobs
Preparation
Free Books
Government Jobs
Constitution Awareness Quiz - 2025
Yuva Career Club Registration

Important Links

About Us
Contact Us
Privacy Policy
Disclaimer
Terms and Conditions

Copyright © 2025 Yuva Career.com, All Rights Reserved.